महाराष्ट्र शासन
सहसंचालक (उच्च शिक्षण), नागपूर विभाग,
जुने मॉरीस कॉलेज इमारत, सिताबर्डी, नागपूर - ४४० ००१
Web : www.jdhengp.in
E-Mail : jdhengp@rediffmail.com | E-Mail : rjdng.dhepune@nic.in
फोन नं. ०७१२-२५६१७१३ | फॅक्स न. ०७१२-२५५४२१०

क्रमांक : उशिनाग/आस्था/ई-ऑफिस/ २०२५ /१६६४ | दिनांक : २८.०४.२०२५

# परिपत्रक

**विषय:- उच्च शिक्षण संचालनालय व अधिनस्त कार्यालयांमध्ये ई-ऑफीस ची अंमलबजावणी करणेबाबत......**

संदर्भ:- १. शासन परिपत्रक क्रमांक:मातंस २०२२/प्र.क्र.६२/से-१/३९,दिनांक.२३.०२.२०२३
२. शासन परिपत्रक क्रमांक:कार्यप-२०२३/प्र.क्र.०१/१८(र.व.का.),दिनांक. १५.०६.२०२३
३. शासन परिपत्रक क्रमांक:संकीर्ण-२०२३/प्र.क्र./२४/नोंशा,दिनांक.१८.०७.२०२३
४.संचालनालयाचे परिपत्रक क्र.उशि/प्रशा-३/ई-ऑफिस/८२६५, दि.२०.०७.२०२३
५. संचालनालयाचे परिपत्रक क्र.उशि/प्रशा-३/ई-ऑफिस/९१७४, दि.१८.०८.२०२३

उपरोक्त विषयान्वये सदर्भाधीन शासन तसेच संचालनालयाचे परिपत्रकान्वये उच्च शिक्षण संचालनालय व अधिनस्त कार्यालयांमध्ये ई-ऑफि सची अंमलबजावणी करणेसाठी करावयाच्या कार्यवाहीबाबत सविस्तर सूचना दिलेल्या आहेत. तसेच प्रस्तुत कार्यालयाच्या आस्थापनेवर कार्यरत असलेल्या सर्व अधिकारी व कर्मचारी यांचे ई-ऑफिसकरिता लॉगिन आय-डी देण्यात आलेले आहे.

तसेच संदर्भाधीन अ.क्र. ३ येथील दिनांक.१८.०७.२०२३ रोजीच्या शासन परिपत्रकान्वये, उच्च व तंत्र शिक्षण विभागांतर्गत येणा-या क्षेत्रीय कार्यालयांमधील दैनंदिन कार्यालयीन कामकाज पार पाडताना सामान्य प्रशासन विभाग,शासन परिपत्रक दि.१५/०६/२०२३ नुसार प्रसिध्द केलेली महाराष्ट्र कार्यालयीन कार्यपध्दती नियमपुस्तिका,२०२३ मधील तरतुदींचे काटेकोरपणे पालन करणेबाबत कळविण्यात आलेले आहे. तसेच यापुढे उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई येथे पाठवावयाचे गोपनिय पत्र वगळता इतर सर्व टपाल ई-ऑफिस प्रणालींच्या माध्यमातूनच पाठविण्याबाबत निर्देश दिलेले आहे.

संचालनालयाच्या संदर्भाधीन क्र.५ च्या परिपत्रकान्वये उच्च शिक्षण संचालनालयाच्या अधिपत्याखालील सर्व शासकीय कार्यालये तसेच त्यांचे अधिपत्याखालील सर्व शासकीय महाविद्यालये/संस्था/वसतीगृहे यांनी कार्यालयामधील ई-ऑफिस प्रणाली तात्काळ कार्यान्वित करून,संचालनालयास यापुढे गोपनिय पत्र वगळता इतर सर्व टपाल केवळ ई-ऑफिस प्रणालीमार्फतच संचालनालयातील ई-टपाल केंद्रामध्ये पत्रव्यवहार करण्याबाबतचे निर्देश दिलेले आहे.

तसेच संचालनालयाच्या अधिनस्त असलेल्या अशासकीय अनुदानित/विनाअनुदानित महाविद्यालये/संस्था तसेच अकृषी विद्यापीठे यांच्या कार्यालयामध्ये सद्यस्थितीत ई-ऑफिस प्रणाली कार्यान्वित झालेली नसल्यामुळे त्यांनी संचालनालयास director.dhepune@gov.in या ईमेलवर तसेच संबंधित शाखेच्या ईमेलवर पत्रव्यवहार करण्याबाबत निर्देशित केलेले आहे.

सबब प्रस्तुत कार्यालयाच्या अधिनस्त असलेल्या सर्व शासकीय महाविद्यालये/वसतिगृह व अशासकीय अनुदानित/विनाअनुदानित महाविद्यालये/संस्था तसेच अकृषी विद्यापीठे यांनी संचालनालयाच्या संदर्भ क्र.५ च्या परिपत्रकामध्ये दिलेल्या निर्देशानुसार कार्यवाही करावी.

प्रस्तुत कार्यालयामध्ये ई-ऑफिस प्रणालीमार्फत टपाल स्विकृतीसाठी तसेच निर्गमित करणेसाठी खालील नमुद केल्यानुसार मध्यवर्ती ई-टपाल केंद्राची निर्मिती केलेली आहे. तथा या कार्यालयात टपाल (मुळ दस्ताऐवज) सादर करतांना सदर टपाल पीडीएफ फॉरमॅटमध्ये स्कॅनकरून **पेनड्राईवमध्ये** घेऊन यावे व कार्यालयात आवक विभागात सादर करावे. त्याशिवाय टपाल स्वीकारले जाणार नाही,याची नोंद घ्यावी.

| अ.क्र. | कर्मचारी यांचे नाव | ई-मेल आय.डी | शेरा |
|---|---|---|---|
| १ | श्री. राजेश सय्याम | JRCLRK1-NAG-DHE@MAH.GOV.IN | टपाल स्विकृती तसेच निर्गमित करणेकरीता |

(डॉ.संतोष चव्हाण)
सहसंचालक उच्च शिक्षण,
नागपूर विभाग,नागपूर

प्रति:-

प्रस्तुत कार्यालय,सर्व अधिकारी व कर्मचारी.

१. संचालक,शासकीय विज्ञान संस्था,नागपूर.
२. संचालक,वसंतराव नाईक शासकीय कला व समाज विज्ञान संस्था,नागपूर.
३. संचालक,शासकीय न्यायसहायय्क विज्ञान संस्था,नागपूर,
४. संचालक,भारतीय प्रशासकीय सेवा पुर्व प्रशिक्षण केंद्र,नागपूर
५. लेखाअधिकारी,उच्च शिक्षण अनुदाने,नागपूर विभाग,नागपूर
६. प्राचार्य,शासकीय अध्यापक महाविद्यालय,भंडारा.
७. प्राचार्य,शासकीय विज्ञान महाविद्यालय,गडचिरोली.
८. अधिक्षक,शासकीय,ई.बी.सी. वसतीगृहे,वर्धा/वरोरा.
९. सर्व प्राचार्य,अशासकीय अनुदानित, विना अनुदानित, कायम विनाअनुदानित, कला, वाणिज्य, विज्ञान, शिक्षणशास्त्र व विधी महाविद्यालये.
१०. सर्व कुलसचिव, अकृषी विद्यापीठे,नागपूर ,रामटेक,गडचिरोली

प्रत माहितीस्तव सादर:-
१.मा.प्रधान सचिव,उच्च व तंत्र शिक्षण विभाग,मंत्रालय,मुंबई.
२.मा.शिक्षण संचालक,उच्च शिक्षण,महाराष्ट्र राज्य,४१२ ई,बहिरट पाटील चौक,शिवाजीनगर,पुणे-४११०१६